# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

**MARATHI**

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2025 JUNE | No. 05


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

स्तोत्रसंहिता २७:१-६

१. यहोवा माझा प्रकाश व माझे तारण आहे; मी कोणाला भिऊ? यहोवा माझ्या जीवनाचे बळ आहे; मी कोणाचे भय धरू?

२. दुष्कर्मी, माझे विरोधी व माझे शत्रू जेव्हा माझे मांस खायला माझ्यावर आले तेव्हा तेच अडखळून पडले.

३. सैन्याने माझ्यापुढे तळ दिला तरी माझे हृदय भिणार नाही; माझ्यावर लढाई उठली तरी मी निर्धास्त राहीन.

४. यहोवाजवळ मी एक गोष्ट मागितली आहे, तीच मी शोधीन: यहोवाची सुंदरता पाहण्यास व त्याच्या मंदिरात ध्यान करण्यास मी माझ्या आयुष्याचे सर्व दिवस यहोवाच्या घरात वसती करावी.

५. कारण संकटाच्या दिवशी मला तो आपल्या मंडपात लपवून राखील; मला तो आपल्या मंडपाच्या गुप्त स्थळी लपवील, तो मला खडकावर उचलून ठेवील.

६. तर आता सभोवतालच्या माझ्या शत्रूंवर माझे डोके उंचावले जाईल, आणि मी त्याच्या मंडपात उत्साहाचे यज्ञ अर्पीन; मी गाईन, होय, मी यहोवाला स्तुती गाईन.

# तुम्ही तुमच्या मुलांकरिता मागे वारसा सोडत आहात का?

–सिस्टर एंजेल

**ARE YOU LEAVING A LEGACY TO YOUR CHILDREN?**




**एको ऑफ हिज कॉलच्या** परिवारातल्या सर्व प्रिय सदस्यांना आपला प्रभु आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या नावाने अभिवादन.

वर्ष २०२५ चे जवळजवळ सहा महिने आपण आधीच पूर्ण केले आहेत यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. असं वाटतंय की, वर्ष नुकतंच सुरू झालं आहे, आणि तरीही, आपण त्याच्या दुसऱ्या सहामाहीत प्रवेश करीत आहोत. यावरून हबक्कूक ३:२ मधील वचनाची आठवण होते : "........ **तू आपले कार्य वर्षांच्यामध्ये पुनर्जीवित कर....**" वर्षाच्या या दुसऱ्या सहामाहीत परमेश्वर तुम्हाला, तुमच्या कुटुंबाला, तुमच्या सेवेला आणि तुमच्या व्यवसायाला, उद्योगाला किंवा अभ्यासाला त्याच्या दैवी कृपेने आणि दयेने पुनरुज्जीवित करील अशी मी प्रार्थना करते.

लूक अध्याय १५ हा शास्त्रातील एक सुप्रसिद्ध परिच्छेद आहे. गेल्या महिन्यात, मी हरवलेल्या मेंढराच्या दृष्टान्ताबद्दल लिहिले होते, ज्याला शोधण्याकरिता त्याचा मेंढपाळ नव्याण्णव मेंढरांना तिथेच सोडून जंगलात जातो. संपूर्ण अध्यायाचा सारांश ९९:९:१ असा देता येईल – तिथेच असलेले ९९ मेंढरे, न हरवलेल्या ९ नाणी आणि वडिलांचे प्रेम समजून न घेता घर सोडून गेलेला १ मुलगा.

(...पान ३ वर)

**एको ऑफ हिज कॉल**

*यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !*

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत

सहभागी होण्याची संधी

*पाच मिनिटांचा संदेश*

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

* कृपा करुन सबक्राईब करा *

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



REACHING NATIONS



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.



EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers


10, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call


**आकाशे आणि पृथ्वी यांचा निर्माण करणारा जो यहोवा त्याच्या नावात आमचे साहाय्य आहे - स्तोत्र १२४:८**

ख्रिस्तातील प्रियजनहो,

आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नावात तुम्हांस कृपा, शांति आणि सर्वप्रकारची दया असो.

आपण एका चांगल्या आणि विश्वासू देवाची सेवा करतो आणि तो आपल्याला ज्या मार्गाने नेत आहे त्याबद्दल आपण नेहमीच कृतज्ञ आहोत. आव्हाने आणि अडचणींच्या काळातही, आमच्यासोबत विश्वासूपणे प्रवास करणाऱ्या आमच्या समर्पित सहकाऱ्यांबद्दल आणि सहभागीदारांबद्दल आम्ही परमेश्वराचे मनापासून आभार मानतो आणि स्तुती धन्यवाद देतो. तुम्ही करीत असलेल्या नियमित प्रार्थनांची आम्ही सराहना करतो.



*संतोषपुरम येथील व्हेकेशन बायबल स्कूल.*

एप्रिल आणि मे महिन्यात विविध ठिकाणी मुलांसाठी आयोजित केलेल्या आमच्या **व्हेकेशन बायबल स्कूलला** देवाने भरपूर आशीर्वादित केल्याबद्दल आम्ही देवाचे आभार मानतो. ही जबाबदारी यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न केल्याबद्दल आम्ही आमच्या सर्व सहकाऱ्यांचे, ख्रिस्तातील बंधूंचे आणि बहिणींचे मनापासून आभार मानतो.



*नहेम्या बायबल कॉलेजच्या शिक्षकांची मिटींग.*

तुमच्या प्रार्थना, दान आणि अर्पणांना प्रभु भरपूर फळ देवो. आम्ही तुमच्या आणि तुमच्या कुटुंबियांसाठी मनापासून प्रार्थना करतो याची कृपया खात्री बाळगा.

आगामी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ च्या कृती आराखड्यावर प्रार्थनापूर्वक चर्चा करण्यासाठी **नेहेमिया बायबल कॉलेजेसची** प्राध्यापकांची बैठक २१ एप्रिल २०२५ रोजी

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) YouTube Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

आयोजित करण्यात आली होती.

देवाच्या कृपेने, आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज** आणि **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल**मध्ये वर्ग सुरू झाले आहेत. मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि शैक्षणिक सेवेत सहभागी असलेल्या सर्वांची तुम्ही प्रार्थनेत आठवण ठेवावी अशी तुम्हाला विनंती करतो.

ख्रिस्ताच्या कार्यात सहकारी म्हणून, आम्ही तुमच्या सतत मध्यस्थीची अपेक्षा करतो, जेणेकरून आम्हाला आमच्या सर्व प्रयत्नांमध्ये देवाची विपुल कृपा प्राप्त व्हावी.

त्याच्या सेवेमध्ये,

**एको ऑफ हिज कॉल परिवार.**

E.mail : sam@echoofhiscall.org

## तात्काळ पाहिजेत

**आम्हाला गुणवत्तापूर्ण, अनुभवी, निष्ठावंत, मेहनती आणि उद्देश्यपूर्ण ख्रिस्ती शिक्षकांची आवश्यकता आहे.**

**सेंट पॉल मॅट्रीक्युलेशन स्कूल,**
एको ऑफ हिज कॉल
इन्स्टिट्यूशन, विजयानगरम,
मेदावक्कम, चेन्नई- १००.

***वैयक्तिक तपशिलासह येथे अर्ज करा:***
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858




## अत्यंत महत्त्वाची सुचना!

नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे ताबडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६०००0५, भारत**
Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org

(पान १ वरुन...)

भारतात जून महिन्यात फादर्स डे साजरा केला जात असल्याने, त्याच अध्यायातून वडिलांच्या प्रेमावर चिंतन करावे असे मला वाटले.



*पित्याचे प्रेम!*

मला समजते की, हा संदेश कदाचित सर्वांनाच पटणार नाही– विशेषतः जे त्यांच्या वडिलांशिवाय मोठे झाले किंवा ज्यांचे वडील त्यांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पाडू शकले नाहीत. अशांची मी मनापासून माफी मागते आणि करुणा व्यक्त करते. मी अशा स्त्रियांच्या अफाट शक्ती आणि त्यागाचा आदर करते, ज्यांनी पित्याची भूमिका पार पाडण्यासाठी एकाकीपणे आपले सर्वस्व पणाला लावले. ही एक विलक्षण आव्हानात्मक भूमिका आहे, अगदी एक महिला म्हणून जरी तुम्ही पित्याच्या पावलांवर पाऊल ठेऊन त्या मार्गाने चालत असाल तर तुम्हाला सलाम आहे!

बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे वडील, जखऱ्या याच्यासारखे, जे अजूनही मुले होण्याची वाट पाहत आहेत आणि प्रार्थना करीत आहेत, अशांचाही मी सन्मान करू इच्छिते. जरी तुम्हाला अद्याप जैविक मुले नसली तरी, मला विश्वास आहे की, देव तुम्हाला संगोपन, मार्गदर्शन आणि पालनपोषण करण्यासाठी अनेक आध्यात्मिक मुले देईल. धीर धरा आणि धाडस बांधा!

माझ्या सोबत झालेल्या एका जबरदस्त भेटीच्या घटनेमुळे मी सुरुवातीलाच हे सर्व शेअर करते. पित्याचे प्रेम या विषयावर उपदेश दिल्यानंतर, एका अतिशय दुखावलेल्या आणि रागावलेल्या तरुणीने माझ्याशी संपर्क साधला. जेव्हा स्वर्गातल्या पित्याच्या प्रेमाची तुलना जगिक पित्याबरोबर केली जात होती, तेव्हा जगिक पित्यासोबतच्या तिच्या वेदनादायक अनुभवांमुळे ती त्या उपदेशाला स्वीकारू शकत नव्हती. आपल्या स्वर्गीय पित्याचे



खरे स्वरूप मला तिला प्रेमाने समजावून सांगावे लागले. जसे, तो कोणत्याही जगिक पित्यासारखा कसा नाही आणि त्याचे प्रेम परिपूर्ण, संजीवनी देणारे आणि बिनशर्त कसे आहे. तेव्हाच तिला देवाच्या प्रेमाचा खरा अर्थ समजू लागला.

सर्व संस्कृतींमध्ये घरातल्या पित्याची भूमिका खूप महत्त्वाची आहे. त्याला अनेकदा कुटुंबाचा प्रमुख मानले जाते – त्याच्यावर त्याच्या कुटुंबाच्या गरजा

पुरविण्याची, महत्त्वाचे निर्णय घेण्याची आणि त्याच्या मुलांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे.

पवित्र शास्त्रामध्ये देवाला पित्याच्या रूपात वारंवार कशाप्रकारे चित्रित केलेले आहे हे पाहणे अप्रतिम आहे. येशू ख्रिस्त स्वतः आपल्याला देवाशी व्यक्तिगतरीत्या संवाद साधण्यास शिकवतो: "...... **हे आमच्या आकाशातील बापा.....**" (मत्तय ६:९). चला तर, शास्त्रवचनांच्या दृष्टिकोनातून, विशेषतः लूक अध्याय १५ मधून आध्यात्मिक किंवा जैविक अर्थाने पिता असण्याचा खरा अर्थ काय आहे ते पाहूया.

या अध्यायात एक परिचित दाखला सांगितलेला आहे, परंतु मला थोडक्यात त्याचा सारांश सांगण्याची परवानगी द्या. ही कथा एका श्रीमंत वडिलांपासून सुरू होते ज्यांना दोन मुले आहेत. धाकटा मुलगा, जो स्वतःच्या अभिलाषांनी प्रेरित होऊन, वारसा हक्कातील आपला वाटा मागतो आणि सांसारिक सुखांना उपभोगण्यासाठी आपले घर सोडतो. आपल्याकडे असलेल्या सर्वांची तो उधळपट्टी करतो आणि शेवटी कंगाल झाल्याचे त्याला समजते, उदरनिर्वाहासाठी डुकरांना चारा घालतो आणि त्यांचे अन्न खाण्याची प्रबळ इच्छा धरतो. त्याच्या सर्वात बिकट परिस्थितीत, तो त्याच्या



धाकटा मुलगा डुकरांना खायला घालतो.

वडिलांची आठवण करतो; मुलगा म्हणून नाही तर एक नोकर म्हणून परत जाण्याची आशा बाळगतो.

तरीही, जेव्हा तो घरी परततो, तेव्हा त्याचे वडील त्याला दुरून पाहतात, त्याला मिठी मारण्यासाठी धावतात, त्याला उत्तम कपडे आणि दागिने घालतात आणि त्याच्या परतीचा आनंद साजरा करण्यासाठी एक भव्य मेजवानी आयोजित करतात.

दरम्यान, मोठा मुलगा, जो घरीच राहून आपल्या वडिलांची विश्वासूपणे सेवा करीत होता, त्याला दुर्लक्षित केल्याचे वाटल्याने त्याला त्याचा राग येतो. तो उत्सवात सामील होण्यास नकार देतो, त्याच्या वडिलांच्या प्रेमाचे गांभीर्य समजून घेण्यासाठी संघर्ष करतो. विडंबन म्हणजे, तो शरीराने जरी आपल्या पित्या जवळ होता, तरी भावनिकदृष्ट्या दूरच राहिला. याउलट, धाकट्या मुलाने बंडखोरी केलेली असताना सुद्धा, त्याला त्याच्या वडिलांच्या स्वभावाची आंतरिक समज होती. अगदी दूरच्या देशात असतानाही, त्याला विश्वास होता की, तो अजूनही परत जाऊ शकतो – निंदित होण्यासाठी नाही, तर स्वीकारला जाण्यासाठी.

## देव आपला पिता:

## १. एक प्रेमळ पिता!

जरी या दाखल्यामध्ये बहुतेकदा धाकट्या मुलाला मध्यवर्ती व्यक्ती म्हणून पाहिले जाते, तरी त्याऐवजी आपण वडिलांना मुख्य पात्र म्हणून पाहूया. तो आपल्या प्रेमळ स्वर्गीय पित्याचे प्रतिनिधित्व करतो; एक असा देव, जो त्याच्या मुलांवर प्रेम करतो या आधारावर नाही की, ते काय करतात किंवा ते कोण आहेत, मात्र त्याचे प्रेम हे तो कोण आहे यावर पूर्णपणे आधारित आहे.

त्याचे प्रेम स्थिर, न बदलणारे आणि कोणतीही अट नसणारे आहे.

निर्गम ४:२२ मध्ये, इस्राएली लोकांना **देवाचे प्रथम जन्मलेले** असे संबोधले आहे. वारंवार त्याच्यापासून दूर जाऊन सुद्धा, देवाने त्यांना आपल्या बळवंत आणि पसरलेल्या हाताने वाचवले आणि त्यांचे पालनपोषण केले. त्याचे आपल्या मुलांवरील प्रेम कधीही कमी होत नाही.

त्याचप्रमाणे, या कथेत, पिता आपल्या मुलाला त्याच्या अपयशांबद्दल फटकारत नाही किंवा टीका करीत नाही. त्याऐवजी, तो त्याचे स्वागत खुल्या हातांनी करतो आणि त्याचे परत येणे आनंदाने साजरे करतो. तो भूतकाळात रमत नाही, तर पुनर्भेटीत आनंद मानतो.

आपल्या स्वर्गीय पित्याचे प्रेम असे आहे – अतुलनीय, करुणामय आणि विनामूल्य दिलेले. तो आपल्याला आपल्या पात्रतेनुसार स्वीकारत नाही, तर त्याच्या कृपेच्या आणि दयेच्या विपुलतेमुळे स्वीकारतो.

पवित्र शास्त्र आपल्याला शिकवते की, **बापांनो, तुम्ही आपल्या मुलांना चिडवू नका, तर प्रभूसंबंधी शिस्त व बोध यांनी त्यांचा प्रतिपाळ करा** (इफिस ६:४).



प्रेमळ पिता!

आपल्यापैकी काहींना असे वाटते की, आपल्या मुलांशी कठोरपणे वागणे किंवा त्यांच्याशी वाईट शब्दांनी बोलणे योग्य आहे. तथापि, पवित्र शास्त्र आपल्याला आठवण करून देते की, आपल्या मुलांना शिस्त लावतानाही आपण सौम्य आणि विचारशील असले पाहिजे, त्यांना राग येईल असे चिडवू नये याची खात्री केली पाहिजे. प्रभु आपल्याला त्याचे हृदय

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - जून, २०२५ पासून ते १८ जुलै, २०२५

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✞ याकरीता देवाची स्तुती करा...

जून १९ - समर्पित सहाय्यक संपादक जे आम्हाला '**एको ऑफ हिज कॉल**' मासिक १६ भाषांमध्ये वेळेवर प्रकाशित करण्यास मदत करतात त्यासाठी देवाची स्तुती असो.

२० जून - १९६९ मध्ये आमच्या मासिक सेवेची स्थापना झाल्यापासून देवाच्या विश्वासयोग्यतेप्रमाणे दिलेल्या आशिर्वादाबद्दल देवाची स्तुती असो.

२१ जून - **एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीज**च्या सर्व समर्थकांबद्दल देवाची स्तुती असो.

२२ जून - १७ मे २०२५ रोजी महाबलीपुरम येथे झालेल्या **नहेम्या बायबल कॉलेजच्या** विद्यार्थी मेळाव्याला देवाने केलेल्या आशिर्वादाबद्दल देवाची स्तुती असो.

२३ जून - आमच्या हितचिंतकांच्या प्रार्थना आणि आर्थिक मदतीसाठी देवाची स्तुती असो.

२४ जून - आमच्या निवासी आणि संध्याकाळच्या **नहेम्या बायबल कॉलेजेस** आणि **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल**साठी २०२४-२५ शैक्षणिक वर्षाची यशस्वी पूर्तता झाल्याने देवाची स्तुती असो.

२५ जून - देवाच्या कृपेने गेल्या काही वर्षांत आपल्या सेवेला उत्तम फळ मिळाले आहे त्याबद्दल देवाची स्तुती असो.

२६ जून - आमचे ज्येष्ठ पाळक आणि त्यांच्या कुटुंबाला सर्व प्रकारच्या वाईटापासून दैवी संरक्षण दिल्याबद्दल देवाची स्तुती असो.

२७ जून - सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल आणि नहेम्या बायबल कॉलेजेसमध्ये २०२५-२६ शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

२८ जून - आपल्या **बायबलकोर (बायबल कॉरस्पॉंडन्स कोर्स)** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉंडन्स कोर्सेस** यांच्या आध्यात्मिक प्रभावाबद्दल देवाची स्तुती असो.

२९ जून - **ग्लोबल व्हिजन फॉर युथ अँड कीड केअर मिनिस्ट्रीज**साठीच्या आमच्या जागतिक दृष्टिकोनावर, विशेषतः जगभरातील युवक आणि मुलांसाठी रात्री १०:०० वाजता होणाऱ्या आमच्या मध्यस्थीच्या प्रार्थनेवर देवाचा हात असल्याबद्दल देवाची स्तुती असो.

३० जून - आमच्या **एको ऑफ हिज कॉल** कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांच्या संरक्षणाबद्दल आणि तरतुदीबद्दल देवाची स्तुती असो.

०१ जुलै - आमच्या मुख्य आणि शाखा असलेल्या मंडळीमधील **व्हेकेशन बायबल स्कूल** कार्यक्रमांच्या भरगोस यशाबद्दल देवाची स्तुती असो.

०२ जुलै - आमच्या **एको ऑफ हिज कॉल** चर्च अचिव्हर्स पुरस्कार सोहळ्याच्या यशाबद्दल देवाची स्तुती असो.

०३ जुलै - आमच्या सर्व **बायबल कॉलेज** विद्यार्थ्यांवर देवाचे संरक्षण असल्याबद्दल देवाची स्तुती असो.

## ✞ कृपया यासाठी प्रार्थना करा...

०४ जुलै - जगभरातील मिशनऱ्यांना दैवी संरक्षण मिळावे यासाठी प्रार्थना करा.

०५ जुलै - सर्व राष्ट्रांमध्ये शांतता नांदावी यासाठी प्रार्थना करा.

०६ जुलै - उपेक्षित आणि दलित लोकांच्या आर्थिक उत्थानासाठी प्रार्थना करा.

०७ जुलै - दुर्गम भागातील लोकांपर्यंत पोहोचणाऱ्या मिशनऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या क्षमतेसाठी प्रार्थना करा.

०८ जुलै - या महिन्यात आपल्या सर्व गरजांसाठी देवाने तरतूद करावी यासाठी प्रार्थना करा.

०९ जुलै - प्रत्येक राष्ट्रात देवाचे भय मानणारे नेतृत्व उदयास यावे यासाठी प्रार्थना करा.

१० जुलै - आमचे वरिष्ठ पाळक रेव्ह. एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षेसाठी आणि उन्नतीसाठी प्रार्थना करा.

११ जुलै - पात्र विद्यार्थ्यांना २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी आमच्या निवासी आणि संध्याकाळच्या **नहेम्या बायबल कॉलेज** आणि **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल**मध्ये प्रवेश मिळावा यासाठी प्रार्थना करा.

१२ जुलै - २ जून २०२५ रोजी नवे वर्ग सुरू होणाऱ्या नहेम्या बायबल कॉलेजच्या नवीन विद्यार्थ्यांसाठी देवाचे मार्गदर्शन लाभावे यासाठी प्रार्थना करा.

१३ जुलै - **एको ऑफ हिज कॉल** या मिनिस्ट्रीजसाठी अधिक समर्पित सेवक तयार केले जावे यासाठी प्रार्थना करा.

१४ जुलै - जगभरातील सर्व आध्यात्मिक प्रमुखांच्या ज्ञानासाठी आणि सामर्थ्यासाठी प्रार्थना करा.

१५ जुलै - आमच्या प्रार्थनेमध्ये सहभागीदार असलेले, तसेच सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार आणि त्यांच्या कुटुंबियांवर देवाची दया असावी यासाठी प्रार्थना करा.

१६ जुलै - आपल्या सर्व सेवाकार्याच्या सभा आणि संघटनात्मक कार्यांवर देवाची कृपा असावी यासाठी प्रार्थना करा.

१७ जुलै - दहशतवाद आणि हिंसाचारापासून सर्व राष्ट्रांचे संरक्षण व्हावे यासाठी प्रार्थना करा.

१८ जुलै - आमच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना आणि प्रिंटिंग प्रेसमधील कर्मचाऱ्यांना चांगले आरोग्य आणि बळ मिळावे यासाठी प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

प्रतिबिंबित करणारे वडील बनण्यास मदत करो.

आपला चांगला पिता नेहमीच आपण त्याच्याकडे परत येण्याची वाट पाहत असतो. आपण आपल्या स्वर्गीय पित्यापासून कितीही दूर गेलो असलो तरी, तो प्रेमाने आणि खुल्या हातांनी आपले स्वागत करण्यास तयार असतो.

## २. वाट पाहणारा पिता!

लूक १५:२० मध्ये आपण वाचतो: **"मग तो उठून आपल्या बापाकडे आला, पण तो अजून दूर आहे इतक्यात त्याचा बाप त्याला पाहून कळवळला, आणि त्याने धावत जाऊन त्याच्या गळ्यात मिठी घातली व त्याचे पुष्कळ मुके घेतले."** हा हृदयस्पर्शी क्षण एका वडिलांच्या हृदयाची भावना प्रकट करतो, जो दररोज आपल्या मुलाची वाट पाहत होता आणि त्याच्यासाठी कळवळत होता आणि आपला मुलगा परत येईल या आशेवर होता.

त्याचप्रमाणे, आपला स्वर्गीय पिता आपल्या प्रत्येकाबरोबर समेट घडवून संबंध प्रस्थापित होण्याची वाट पाहतो. आदाम आणि हव्वा यांच्याकडून त्याला हेच हवे होते - एक खोल, घनिष्ठ नाते, आणि आज तो आपल्याकडून सुद्धा हेच इच्छितो - कळवळा येणे आणि वाट पाहणे!

**"तर तुम्हांवर कृपा करावी म्हणून यहोवा वाट पाहील......"** (यशया ३०:१८). तो त्याची दया, कृपा आणि अनुग्रह ओतण्याची वाट पाहत आहे - अगदी दाखल्यातील पित्याप्रमाणे.

जेव्हा आपण त्याच्याकडे परत येतो तेव्हा तो आपली कसून चौकशी करणार नाही किंवा आपल्याला लज्जित होऊ देणार नाही. त्याऐवजी, तो आपल्याला मिठीत घेईल आणि त्याच्या चांगुलपणाने आशीर्वाद देईल. तुमच्यामध्ये आणि त्याच्यामध्ये खूप अंतर पडले आहे आणि तुम्ही त्याच्या प्रेमाला पात्र नाही असे तुम्हाला वाटत असेल किंवा त्याच्याकडे परतण्यास संकोच होत असेल, तर तुम्ही हे जाणून घ्या की, तुम्ही त्याच्यापासून फक्त एक पाऊल दूर आहात. तो आता तुमची वाट पाहत आहे.

## ३. वारसा मागे सोडणे!



*मुले त्यांच्या पित्याकडून खूप काही शिकतात.*

पितृत्वाचा हा एक महत्त्वाचा आणि अनेकदा दुर्लक्षित केलेला पैलू आहे. जसा बाप, तसा मुलगा ह्या जुन्या म्हणीमध्ये खोल सत्य आहे. वडील त्यांच्या मुलांना केवळ अनुवंशिकतेच्या गोष्टीच संक्रमित करीत नाही, तर ते जैविक आणि आध्यात्मिक दोन्ही स्वभाव प्रवृत्ती देखील देतात. अनेक तरुणांसाठी, त्यांचे वडील हे त्यांचे पहिले हिरो असतात. ते त्यांच्याकडून खूप काही शिकतात - फक्त कसे जगायचे हेच नाही तर कसे जगू नये हे देखील.

दुर्दैवाने, बहुतेकदा नकारात्मक गुण सहजतेने संक्रमित होतात. तरीही, वडील एक 'शाश्वत वारसा' सोडून जातात, मग त्यांना त्याची जाणीव असो वा नसो. ते त्यांच्या मुलांच्या आध्यात्मिक जीवनाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

### निर्गम १५:२ मध्ये आपण वाचतो:

**"याह माझे बल व माझे गीत आहे; तो माझे तारण झाला आहे; तो माझा देव आहे, आणि मी त्याची स्तुती करीन; तो माझ्या बापाचा देव आहे, आणि मी त्याला थोर मानीन."**

माझ्या बापाचा देव हे वाक्यांश हे प्रतिबिंबित करते की, देवावरील श्रद्धा लहानपणीच शिकली गेली होती - वडिलांच्या प्रभावातून.

### अनुवाद ३२:७ हे वचन सांगते:

"पुरातन काळाचे दिवस आठीव, बहुत पिढ्यांची वर्षे ध्यानात आण; तू आपल्या बापाला विचार, तो तुला कळविल......"

### स्तोत्र ४४:१ आणखी नमूद करते:

"हे देवा, आम्ही आपल्या कानांनी ऐकले आहे, तू त्यांच्या दिवसांत, पुरातन दिवसांत जे कार्य केले ते आमच्या वडिलांनी आम्हांस सांगितले आहे."

### आणि स्तोत्र ७८:३-४ ही वचने हे जाहीर करतात:

त्या गोष्टी आम्ही ऐकल्या व जाणल्या आणि आमच्या वडिलांनी आम्हांला सांगितल्या आहेत; त्या आम्ही त्यांच्या

(...पान ९ वर)

नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
प्रवेशा करिता त्वरा करा ! माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
ईश्वरविद्या डिप्लोमा हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५५ वर्षांपासून मान्यता प्राप्त
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१३. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१४. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१५. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१६. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१७. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१८. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. इंग्रजी आणि हिंदी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२१. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२२. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२३. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२४. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२५. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२६. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२७. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार६
२८. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२९. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३०. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३१. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३२. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्री १० वाजता (फोन द्वारा)
३३. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३४. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

**केवळ भारतातील उमेदवारां करीता**

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान अभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज**
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

**''अहो तुम्ही यहोवाला धन्यवाद द्या,... ज्याने आमच्या नीच दशेत आमची आठवण केली त्याला, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे'' (स्तोत्र १३६:१,२३).**

माझ्या सेवाकार्याच्या सुरुवातीपासूनच, देवाने मला कोणत्याही मर्यादेपर्यंत जाण्याची आणि देवाचे गौरव करण्यासाठी आणि त्याच्या राज्याच्या विस्तारासाठी कोणतेही आव्हान स्वीकारण्याची बुद्धी दिली, कोणत्याही तात्काळ प्रतिफळाची अपेक्षा न करता. १९७६ ते १९८६ पर्यंत, मी माझ्या सरकारी कार्यालयातून रजा घेऊन सुवार्तिक दौरे आयोजित करीत असे आणि भारतातील वेगवेगळ्या भागात छोट्या छोट्या धार्मिक अभियानाद्वारे सुवार्तेचा प्रचार करीत असे, आणि तेही माझे स्वतःचे पैसे खर्च करून.

प्रभूने मला माझ्या आत्मिक मित्रांना किमान एक किंवा दोन महिने वेगवेगळ्या भागात घेऊन जाण्यास आणि पोहोचलेल्या गावांमध्ये जाऊन येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेद्वारे हजारो लोकांच्या जीवनाला स्पर्श करण्यास मदत केली. अनेक वेळा, मला माझ्या सर्व आर्थिक गरजांसाठी देवावर अवलंबून राहावे लागले, जसे की मला ट्रेनची तिकिटे, बसची तिकिटे खरेदी करावी लागत असे, आणि माझ्यासाठी आणि माझ्या सहकाऱ्यांसाठी निवासासाठी हॉटेल बुक करावे लागत असे. मात्र, देवाने चमत्कारिकरित्या मला मदत केली.

या सेवेद्वारे, देवाने मला चेंगलपुट जिल्हा, विल्लुपुरम जिल्हा, मदुराई जिल्हा, त्रिची जिल्हा आणि कन्याकुमारी जिल्हा, कोडाईकनाल, उटाकामुंड, त्रिवेंद्रम, पीरमाडे, इडुक्की, वंदीपेरियार, विजयवाडा, बंगळुरू, म्हैसूर इत्यादी विविध दुर्गम भागांना भेट देण्यास मदत केली. माझ्या प्रवासादरम्यान, बस आणि ट्रेनमधून आमची वाद्ये आणि शुभवर्तमान पत्रिका एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना मला वेगवेगळ्या प्रकारचे शारीरिक त्रास सहन करावे लागले. माझी आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने, मी सेवेसाठी विशेष वाहनाची सुद्धा सोय करू शकत नव्हतो. पण देव माझी वृत्ती पाहत होता आणि माझ्या साक्षी ऐकत होता. ''**कारण तुम्ही पवित्रांची सेवा केली आहे आणि तुम्ही ती करीत आहा, ह्यात तुमचे काम, आणि त्याच्या नावावर असलेली तुम्ही दाखवलेली तुमची प्रीती, ही देवाने विसरावी, असा तो अन्यायी नाही.**'' - इब्री ६:१०.

नंतर मला समजले की, देवाने माझ्या सर्व सहकाऱ्यांना आशीर्वाद दिला आणि त्यांना उच्च पातळीवर नेले आणि आजही तो त्यांच्या द्राक्षमळ्यात त्यांचा जोरदार वापर करीत आहे. त्याने मला नवीनतम उपकरणे, कार, व्हॅन आणि उत्साही कार्यकर्ते अशा सर्व सुविधा दिल्या, आजही भारतातील परिवर्तन न झालेल्या लोकांना सुवार्ता सांगण्यासाठी मला तो अधिकाधिक सक्षम करीत आहे. तसेच देवाने मला सन्मानित केले, मला जगातील विविध देशांमध्ये नेले आणि चांगले मित्र दिले.

तोच देव अजूनही जिवंत आहे. जे कोणत्याही तात्काळ बक्षिसांची, उच्च पदांची अपेक्षा न करता आणि भ्रष्ट उद्दिष्टे न ठेवता त्याची सेवा करण्यासाठी पुढे येऊ शकतात अशा इच्छुक व्यक्तींचा तो शोध घेत आहे. ''**तू आपली भाकर जलांवर टाक, कारण पुष्कळ दिवसांनंतर ती तुला मिळेल**'' - उपदेशक ११:१. तो कोणाचाही ऋणी नाही.

मी वैयक्तिकरित्या शिकलो आहे की, जर आपल्याला देवाच्या राज्यासाठी काही करण्याची इच्छा असेल तर आपण ते लगेच केले पाहिजे, वाऱ्याकडे न पाहता आणि मेघांकडे न पाहता, जसे ''**जो वारा वाहत राहतो तो पेरणारा नाही, आणि जो मेघांकडे पाहत राहतो तो कापणी करणार नाही**'' - उपदेशक ११:४. जग आणि जगिक लोक तुमच्या पाठीशी उभे राहतील.

आजकाल, आपले लोक देवाच्या राज्याच्या वाढीसाठी त्यांचे आरोग्य, पैसा आणि प्रतिभा गुंतवू इच्छित नाहीत; त्याऐवजी तात्काळ पदोन्नतीची आणि लगेचच प्रतिफळ मिळण्याची अपेक्षा करतात. प्रिय मित्रांनो, येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेमुळे मी खरोखरच आशीर्वादित झालो आहे. तो तुम्हालाही आशीर्वादित करील. तुम्ही आता येशू ख्रिस्तासाठी काहीतरी करण्यासाठी पुढे येऊ शकता का? तुम्ही तुमचा वधस्तंभ उचलून त्याचे अनुसरण करू शकता का?? ''**देव अशा इच्छुक व्यक्तींचा शोध घेत आहे, ज्यांना त्याची गौरवशाली सुवार्ता - कोणत्याही प्रकारे, किंबहुना प्रत्येक प्रकारे, कोणत्याही किंमतीत पाठवण्यास खरोखर तत्पर आहे**'' (१ करिंथकर ९:२२).

**जेव्हा तुम्ही त्यातील शब्द वाचता तेव्हा तुम्हाला हे माहित असले पाहिजे की, देवाची तुमच्यासाठी एक खास योजना आहे! जगिक संपत्ती, आरोग्य, नातेसंबंध आणि प्रसिद्धी एक दिवस तुम्हाला फसवेल!! पण येशू ख्रिस्त तुम्हाला निराश करणार नाही!!!** योहान १४:१८. **आजच निर्णय घ्या. एक मोठे प्रतिफळ तुमची वाट पाहत आहे!**

************

(पान ६ वरुन)

लेकरांपासून गुप्त ठेवणार नाही; यहोवाची स्तवने आणि त्याचे सामर्थ्य व त्याने केलेली आश्चर्याची कामे ही आम्ही पुढल्या पिढीला सांगू.

या वचनांमधून हे स्पष्ट होते की, मुले त्यांच्या वडिलांकडून शिकत असतात आणि म्हणून आध्यात्मिक ज्ञान आणि ईश्वरी मूल्ये पुढील पिढीला देणे ही प्रत्येक वडिलांची जबाबदारी आहे.

दुर्दैवाने, आपल्या मुलांच्या जीवनातील अनेक पापं ही मागील पिढ्यांपासून चालत आलेल्या स्वरूपांत रुजलेली असतात. परंतु देवाची इच्छा आहे की, आपण आपल्या मुलांकरीता शापाचा नाही तर आशीर्वादाचा आध्यात्मिक वारसा मागे सोडावा.

पवित्र शास्त्रामध्ये अनेक उदाहरणे दिली आहेत, विशेषतः इस्राएल आणि यहूदाच्या राजांमध्ये, जिथे मुलांनी त्यांच्या वडिलांच्या अधार्मिक मार्गांचे अनुसरण केले आणि अर्थहीन जीवन जगले. २ राजे २१:२१ मध्ये, आपण मनश्शेचा मुलगा आमोन याच्याबद्दल वाचतो: **''आणि ज्या साऱ्या मार्गांत त्याचा बाप चालला त्यांत तो चालला, आणि त्याच्या बापाने ज्या मूर्तीची सेवा केली होती त्यांची सेवा व त्यांची पूजा तो करीत असे.''**

किती दुर्दैवी गोष्ट आहे ही!

मनश्शे स्वतः महान राजा हिज्कीयाचा मुलगा होता, जो परमेश्वरावर मनापासून प्रेम करीत असे. पण तरीही, मनश्शे असा का वागला? त्याला देवाप्रती असलेल्या भक्तीनुसार का वाढवले गेले नाही? यामुळे प्रत्येक वडिलांसमोर एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो: तुम्ही कोणता वारसा मागे सोडत आहात?

१ राजे ११:४-९ मध्ये आपण वाचतो: **''आणि असे झाले की, शलमोन म्हातारा झाला तेव्हा त्याच्या बायकांनी त्याचे हृदय अन्य देवांकडे वळवले; आणि त्याचे हृदय**



*शलमोनाच्या बायकांनी त्याला अन्य देवांकडे वळवले.*

**त्याचा बाप दावीद याच्या हृदयासारखे पूर्णपणाने यहोवा त्याचा देव याच्याकडे नव्हते.''** संपूर्ण शास्त्रात, आपल्याला असे अनेक बाप आढळतात, ज्यांनी ईश्वरी वारसा प्रस्थापित करण्यात अपयशी ठरल्यामुळे त्यांच्या मुलांवर आणि त्यानंतरच्या पिढ्यांवर विनाश ओढवला. याच्या अगदी उलट, आसा, यहोशाफाट आणि योशीया सारख्या राजांनी हेतुपुरस्सर त्यांच्या पूर्वजांच्या पावलावर पाऊल ठेवले आणि विश्वासाचा कायमचा वारसा प्रस्थापित केला. त्यांच्या आज्ञाधारकतेमुळे केवळ त्यांच्या स्वतःच्या कुटुंबांनाच आशीर्वाद मिळाला नाही, तर शेजारील राष्ट्रांमध्येही शांती प्रस्थापित झाली. २ इतिहास १७:१० हे वचन असे घोषित करते की: **''आणि यहूदाच्या चहूकडील देशांच्या सर्व राज्यांवर यहोवाचे भय पडले म्हणून त्यांनी यहोशाफाटाशी लढाई**



*सर्व राज्यांवर देवाचे भय पसरले.*

**केली नाही.''** आपण आपल्या मुलांसाठी आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी कोणता वारसा सोडणार आहोत?

देवाचे सेवक देखील या धोक्यापासून सुरक्षित नाहीत. मोशे, एली, शमुवेल आणि दावीद हे प्रत्येकजण परमेश्वराचे महान सेवक होते व यांना सुद्धा पित्याच्या भूमिकेत संघर्ष करावा लागला. जशी मोशेची यहोशवासोबत किंवा एलीयाची अलीशासोबत जोडी होती, तशी आपण आध्यात्मिक वारसा उभारण्यात उत्साही असू शकतो, परंतु आपण आपल्या स्वतःच्या मुलांना परमेश्वराच्या भयामध्ये आणि ज्ञानामध्ये वाढवण्यासाठी तितकेच वचनबद्ध आहोत का?

उधळ्या पुत्राचा दाखला लक्षात घ्या: त्याने बंडखोरी आणि अपव्यय केलेला असताना सुद्धा, त्याच्या पित्याचे प्रेम बदलले नाही. स्वर्गीय पित्याचे हे चित्र आपल्याला आठवण करून देते की, देव आपल्याला प्रेमळ, सहनशील पालक बनण्यास आणि विश्वासाने भरलेला वारसा कायम ठेवण्यास सांगतो. प्रभु त्याच्या कृपेचं आणि भक्तीचं उदाहरण बनण्यासाठी आपल्याला सक्षम करो, जेणेकरून आपली मुले आणि त्यांची मुले त्याच्या मार्गात चालतील.

************

**ख्रिस्ती कार्यालयामध्ये खालील पदाची तातडीची आवश्यकता**

**१. कम्प्युटर ऑपरेटर्स**

**२. प्रिंटिंग ऑपरेटर्स**

**Contact : (+91) 98412 71858, E.mail : sam@echoofhiscall.org**

**सूचना:**

(+91) 98410 71858,
(+91) 98412 71858
(मुख्य नंबर्स) हे नंबर्स तुमच्या मोबाईल फोनमध्ये संग्रहित करा
- संपादक.

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
**Please subscribe**

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.

**- Editor**

### OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : | **1023 2934 679** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : | **Echo of His Call** |
| A/C No. | : | **6038 0502 2319** |
| IFSC | : | **ICIC 000 6038** |

***3. Bank : State Bank of India***
**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : | **1023 2923 805** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

## ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :
**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS Patrika Channel"**
**on 12th JUNE 2025.**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**